# वर्धा जिल्हयातील ग्रामीण व नागरी साक्षरतेचे विश्लेषण

**प्रा. विश्वास प्रल्हाद खोब्रागडे**
स्व. निर्धनराव पाटिल वाघाये, कला व विज्ञान महाविद्यालय,
मुरमाडी/तुपकर

**सारांश**

*आधुनिक युगात साक्षरतेला अत्यंत महत्व आहे. जगातील विविध संकल्पना समजून घेण्याकरीता तसेच भाषा, संख्या, प्रतिमा, संगणक आणि इतर अर्थ समजून घेण्याकरिता साक्षरता महत्वाची आहे. एखादया राष्ट्राची लोकसंख्या मोठी असली तरी तेथील लोकांना शिक्षण मिळाले नाही तर तो देश गरीब देश समजला जातो . विकासाच्या दृष्टीने तो देश मागे पडतो. मानवी संस्कृती व सभ्यता असून एखादया देशतील लोकसंख्येचे मूल्यांकन केले जात नाही. परंतु त्या देशातील साक्षरतेने त्या देशात झालेली प्रगती कळून येते. साक्षरता म्हणजे लिखित सामग्रीचा उपयोग करून संख्या व विविध परिमाने माजने व त्याचा व्यवहारात उपयोग करने होय. साक्षरतेचा समावेश मानवी जीवनामध्ये त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी , ज्ञान आणि क्षमता विकसित करण्यासाठी आणि समाजातील तसेच राष्ट्राला सक्षम करण्याकरीता महत्वाची असते. एकदा साक्षरतेचे कौशल्य अंगी आले, की खऱ्या अर्थाने मानव सुसंस्कृत होते. वर्धा जिल्हा हा साक्षरतेच्या बाबतीत कमी साक्षर असलेला जिल्हा आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद या जिल्हातील साक्षरतेचा दर बघता वर्धा जिल्हयातील साक्षरता कमी असल्याचे आढळते. त्यामुळे वर्धा जिल्हयाचा अभ्यास होणे आवश्यक आहे.*

**बीजसंज्ञा— जनगणना, लोकसंख्या, ग्रमीणसाक्षरता, नागरी साक्षरता, शिक्षण**

## प्रस्तावना

**भा**रत देशात साक्षरता पातळी आणि शैक्षणिक प्राप्ती हे विकसनशील राष्ट्रांमध्ये महत्वाचे विकासात्मक संकेतक आहेत. कारण ते मानवी जिवनाची गुणवत्ता जागृतता पातळी दर्शवते. भारतीय समाजातील साक्षरतेचा शैक्षणिक स्तरावर निश्चितच प्रभाव पडतो. मानवी विकास निर्देशांकमध्ये शैक्षणिक मापदंडास अनन्यसाधारण महत्व आहे.

शिक्षणाचे महत्व समजुन भारत देशाने मोफत आणि अनिवार्य शिक्षण सुनिच्छित करण्यासाठी शिक्षणाचा अधिकार बनविलेला आहे. भारत देशात ६ ते १४ वर्षे वयोटातील मुलांना शिक्षण शक्तिचे केले आहे. यावरून साक्षरतेचे महत्व व शिक्षणाचे महत्व भारत देशात किती महत्वपुर्ण आहे ते लक्षात येते.

## अभ्यासक्षेत्र

वर्धा जिल्हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील एक महत्वाचा जिल्हा आहे. हा जिल्हा विदर्भ प्रदेशात नागपुर विभागातील एक महत्वपूर्ण जिल्हा आहे. भौगोलिक स्थान २०,७५ उत्तर अक्षांश ते ७८,६० पुर्व रेखांश यादरम्यान आहे. वर्धा जिल्हा हा प्रशासनाच्या दृष्टीने आठ तालुक्यात विभागलेला आहे. या जिल्हाात वर्धा, देवळी, सेलु, आर्वी, आष्टी ,कारंजा , हिंगणघाट, समुद्रपुर असे तालुके आहेत. वर्धा नदी वर्धा जिल्हातील प्रमुख नदी आहे. २०११ या वर्षाच्या झाालेल्या जनगणनेनुसार वर्धा जिल्हाची लोकसंख्या १२,९६,१५७ आहे.

## शोधाप्रत्रिकेचा उद्देश

प्रस्तुत शोध पत्रिकेचा अभ्यास करताना काही उद्देश डोळयासमोर ठेवून शोधपत्रिका तयार करण्यात आली आहे. ते खालीलप्रमाने

१. वर्धा जिल्हातील साक्षरतेचा अभ्यास करणे.
२.वर्धा जिल्हयाजील ग्रमीन व नागरी साक्षरतेचा अभ्यास करणे.
३. वर्धा जिल्हयातील पुरूष व स्त्री साक्षरतेचा अभ्यास करणे.

## माहीतीचे संकमन व संशोधन पध्दती

''वर्धा जिल्हयातील ग्रामीण व नागरी साक्षरतेचे विश्लेषण'' या शोधपत्रिकेकरिता माहितीचे संकलन विविध प्रशासकीय कार्यालय, संकेतस्थळ, तहसील कार्यालय येथुन माहीती गोळा करण्यात आली आहे . संपूर्ण माहिती ही व्दितीय माहिती स्त्रोतांवर आधारित आहे. शोध पत्रिकेतील माहितीचे संकलन तसेच आकडेवारीचे प्रदर्शन करण्याकरिता सांख्यिकीय पध्दती आलेख व आकृत्यांचा उपयोग करण्यात आला असून विश्लेषण केले आहे.

## माहीतीचे विश्लेषण

भारत देशात २०११या वर्षाच्या जनगणनेनुसार साक्षरतेचा दर १४ टक्केने वाढला आहे. भारतात ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. भारतात शहरी भागात वास्तव्य करणाऱ्यां लोकांत साक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. वर्धा

जिल्हा हा महाराष्ट्रातील एक जिल्हा आहे. हा जिल्हा वर्धा नदीच्या खोऱ्यांत बसलेला आहे. २०११ या वर्षाच्या जनगणनेनुसार वर्धा जिल्हयाची लोकसंख्या १२,९६,१५७ आहे. वर्धा जिल्हा साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्र राज्यात अकराव्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात साक्षरतेचे महत्व अनन्यासाधारण आहे.

**वर्धा जिल्हा साक्षरता (२००१—२०११)**

| वर्ष | २००१ | २०११ |
|---|---|---|
| **लोकसंख्या** | १०,६७,३५७ | १२,९६,१५७ |
| **सरासरी साक्षरता** | ८०.०६ | ८६.९९ |
| **पुरूष साक्षरता** | ८७.१८ | ९१.९२ |
| **स्त्री साक्षरता** | ७२.४५ | ८१.८१ |
| **एकूण साक्षर** | ८,६५,५५६ | १०,१९,४५८ |
| **एकूण पुरूष साक्षर** | ४,८६,७३६ | ५,५२,६१७ |
| **एकूण स्त्री साक्षर** | ३,७८,८२० | ४,६६,८४१ |

सारणी क्रमांक १ वरून असे निदर्शनास येते की यावर्षी सरासरी साक्षरता ८०.०६ होती. २०११ यावर्षी साक्षरतेत वाढ होउन वर्धा जिल्हाची सरासरी साक्षरता ८६.९९ झाली. २०११यावर्षी सरासरी साक्षरता ६.९३ टक्के वाढली आहे. पुरूष साक्षरता २००१ या वर्षी ८७.१८ टक्के असून वर्षी २०११या वर्षी पर्यंत ९१.९२ टक्क्यांनी वाढली. २००१ ते २०११या दहा वर्षात पुरूष साक्षरता ४.७४ टक्क्यांनी वाढली आहे. स्त्री साक्षरता २०११या वर्षी ७२.४५ टक्के होती. ती २०११ या वर्षापर्यंत ८१.८१ टक्केनी वाढली . स्त्री साक्षरता दहा वर्षात ९.४४ टक्के वाढझाली आहे.पुरूष साक्षरता दरापेक्षा वर्धा जिल्हयात स्त्री साक्षरता दर हळूहळू वाढत असल्याचे आढळले आहे.


**सारणी क्रमांक २**
**वर्धा जिल्हा ग्रामीण व नागरी साक्षरता (२०११)**

| | ग्रामीण साक्षरता | नागरी साक्षरता |
|---|---|---|
| **एकुण साक्षर** | ६,६५,०८२ | ३,५४,३७६ |
| **एकुण पुरूष साक्षर** | ३,६५,१९८ | १,८७,४१९ |
| **एकूण स्त्री साक्षर** | २,९९,८८४ | १,६६,९५७ |
| **सरासरी साक्षरता** | ८४.२७% | ९२.६२% |
| **पुरूष साक्षरता** | ८९.९३% | ९६.०५% |
| **स्त्री साक्षरता** | ८९.९३% | ९६.०५% |

स्त्रोत www.census2001.com

**आलेख क्रमांक १**

**Wardha District Rural & Urban Literact 2011**




सारणी क्रमांक २ च्या अभ्यासाने असे निदर्शनास येते की, २०११ यावर्षी नागरी साक्षरता ग्रामीण साक्षरतेपेक्षा अधिक होती. ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण ८४.२७%टक्के होते तर नागरी साक्षरतेचे प्रमाण ९२.६२%टक्क होते. ग्रामीण साक्षरतेपेक्षा नागरी साक्षरतेचे प्रमाण ८.३३ टक्केपेक्षा अधिक होते. पुरूष साक्षरतेचे प्रमाणही नागरी साक्षरतेपेक्षा अधिक होते. स्त्री साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागात कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. नागरी स्त्री साक्षरतेत ११ टक्के प्रमाण अधिक आहे. वर्धा जिल्हयात चे प्रमाण कमी आहे असे आढळले आहे.

**साक्षरतेवर परीणामकरणारे घटक**

वर्धा जिल्हयात ग्रामीण व नागरी भागात साक्षरता कमी अधिक प्रमाणात दिसून येते.

**१) ग्रामीण भागात लोकसंख्येचे प्रमाण अधिक :—**

वर्धा जिल्हयात आठ तालुके आहेत. वर्धा जिल्हयात ग्रामीण भागात ६५ टक्केच्या अधिक लोकसंख्या वास्तव्य करतात त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा व रोजगाराच्या संधी कमी असल्यामुळे मुलांच्या शिक्षणावर याचा परीणाम झालेला आहे. परीणामी साक्षरता वर परीणाम झाला आहे.

**२) पालकांचे आर्थिक उत्पन्न कमी :—**

ग्रामीण भागात वास्तव्य करणारी लोकसंख्या मोठी आहे. ग्रामीण भागात पालकांचे आर्थिक उत्पन्न कमी असुन शेती हा प्रमुख व्यवसाय अनेक नागरीकांचा आहे त्यामुळे मुलांना चांगले शिक्षण देण्यास पालक कमी पडतात याचा परिणाम साक्षरतेवर दिसतो.

**३) शिक्षणाच्या सुविधा कमी :—**

वर्धा जिल्हयात ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा कमी आहेत काही खेडयात अंगणवाडी याव्यतिरीक्त शिक्षणाच्या सुविधा नाही शहरी भगात मोठया प्रमाणात शैक्षणिक सोयी उपलब्ध असते. ग्रामीण भागातील पालक आर्थिक समस्यांमुळे

शैक्षणिक वातावरण शकत नाही. शहरी भागाच्या शिक्षणाचा खर्च तर काही पालक करू शकत नाही याचा परीणाम साक्षरतेवर आहे.

**४) इतर घटक**

वर्धा जिल्हयात ग्रामीण भागातील वसाहती या अत्यंत दुर्मिळ प्रदेशात व बोर अभयारण्याच्या जवळ आहे . या ठिकाणी शिक्षणाच्या सुविधा कमी प्रमाणात आहे.

**निष्कर्ष :—**

वर्धा जिल्हयातील ग्रामीण व नागरी साक्षरतेचे विश्लेषण या शोध पत्रिकेचा अभ्यास करतांना काही निष्कर्ष निघालेले आहे. ते खालीलप्रमाणे

१) २००१ या वर्षातील झालेल्या जनगणनेपेक्षा २०११ या वर्षी साक्षरता ६.९३ टक्के वाढली आहे.

२) २००१या वर्षातील झालेल्या जनगणनेपेक्षा २०११ या वर्षी सुमारे दहा वर्षात स्त्री साक्षरतेमध्ये ९.५० टक्केच्या वर वाढझाली आहे. ही वाए मोठी आहे.

३) २०११ यावर्षी नागरी साक्षरता वाढल्याचे आढळते.

४) वर्धा जिल्हयात ग्रामीण साक्षरतेपेक्षा नागरी साक्षरता मोठी आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) घारपुरे डॉ. विठ्ठल (२००२) लोकसंख्या भुगोल प्रकाशक, पिंपळापुरे प्रकाशन

२) घारपुरे डॉ. विठ्ठल (२०१८) महाराष्ट्राचा भूगोल प्रकाशक, पिंपळापुरे प्रकाशन

३) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका (१९६१) प्रकाशक, संचालक सरकारी मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन मुंबई

४) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका (१९७१) प्रकाशक, Director of census operation Maharashtra

५) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका (१९८१) प्रकाशक, संचालक सरकारी मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन मुंबई

६) वर्धा जिल्हा जनगणना पुस्तिका (१९९१) प्रकाशक, संचालक सरकारी मुद्रण व लेखन सामग्री महाराष्ट्र शासन मुंबई

७) वर्धा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२००१) प्रकाशक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, महाराष्ट्र शासन.

८) www.census2011.com

९) www.censusindia.com

१०) www.wardha.nic.in

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com